# TESTIMONIALS

Expressing gratitude from the Police Department

महाराष्ट्र पोलीस

सद्रक्षणाय खलनिग्रहणाय

## आभारपत्र

प्रति,

प्रकल्प संचालक,

बी.बी.के.जी.एस.एस. पुणे

सप्रेम नमस्कार,

भारतीय बहुउद्देशीय खादी व ग्रामोद्योग प्रशिक्षण संस्था यांच्या वतीने पोलीस दलाच्या उरुळी कांचन पोलीस स्टेशनला नुकतेच पाच संगणक संच भेट देण्यात आलेले आहेत. त्याबद्दल भारतीय बहुउद्देशीय खादी व ग्रामोद्योग प्रशिक्षण संस्थेचे मनापासून आभार.

आपण दिलेल्या संगणक संचामुळे उरुळी कांचन पोलीस स्टेशनच्या कार्यक्षमतेमध्ये निश्चितच वाढ होईल व उरुळी कांचन व पंचक्रोशीतील नागरिकांच्या अडचणी सोडविण्यास मदत होणार आहे. पोलीस खात्याची संगणकीकरण होणे ही अत्यंत गरजेची बाब होती. या संगणकीकरणामुळे वरिष्ठ पातळीवरील कार्यालयाशी पत्रव्यवहार, दळणवळण, दस्त व फाइल्स या कागदपत्रांचे जतन व साठवणूक करणे सुलभ होणार आहे.

भारतीय बहुउद्देशीय खादी व ग्रामोद्योग प्रशिक्षण संस्था ही संस्था अनेक समाज उपयोगी उपक्रमांसाठी गेली ३० वर्षे कार्यरत आहे. विशेषतः जलसंधारण, ग्रामीण विकास, पर्यावरण, वृक्षलागवड आदी क्षेत्रातील कार्य कौतुकास्पद आहे.

उरुळी कांचन पोलीस स्टेशनला संस्थेच्या वतीने संगणक संच भेट दिल्याबद्दल पुन्हा एकदा आभार...

दिनांक: २५/०४/२०२५
ठिकाण: दौंड

(बापूराव दडस)
उपविभागीय पोलिस अधिकारी
दौंड विभाग दौंड